**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राज्यातल्या आशा बावणे यांच्यासह १५ जणांना राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार प्रदान

- जगातल्या सर्व उपकरणांमध्ये भारतानं बनवलेली चीप असायला हवी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची अपेक्षा

- भाजपा सत्तेवर आहे तोपर्यंत कुणीही आरक्षण संपवू शकत नाही, अशी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची ग्वाही

- सोयाबीन आणि कापसाचा हमीभाव वाढवायला, तसेच निर्यातीला परवानगी द्यायला केंद्र सरकार अनुकूल असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं प्रतिपादन

**आणि**

- चंद्रपूरमध्ये विजेचा धक्का बसून चार जण ठार, १ युवक जखमी

<><><><><>

राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार २०२४ वितरण सोहळा आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १५ जणांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात राज्यातल्या चंद्रपूरमधील परिचारिका आशा बावने यांचा समावेश आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं १९७३ मध्ये राष्ट्रीय फ्लोरेंस नाइटिंगेल पुरस्कार द्यायला

सुरुवात केली. हे पुरस्कार उल्लेखनीय काम करणाऱ्या परिचारिकांना दिला जातो.

**<><><><>**

जगातल्या सर्व उपकरणांमध्ये भारतानं बनवलेली चीप असायला हवी असं आपलं स्वप्न असून सेमिकंडक्टरचं पावर हाऊस होण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते भारत करेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्र्यांनी सेमिकॉन इंडिया २०२४ चं ग्रेटर नोएडा इथं आज उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री**

सेमिकंडक्टर कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करण्याचं आवाहन त्यांनी केलं. भारतात गुंतवणूक करण्याची हीच योग्य वेळ आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. या दशकाच्या शेवटापर्यंत इलेक्ट्रॉनिक उद्योग क्षेत्रातली उलाढाल ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचं सरकारचं ध्येय असून यामुळे ६० लाख रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

भाजपा सत्तेवर आहे तोपर्यंत कुणीही आरक्षण संपवू शकत नाही, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर त्यांनी जोरदार टीका केली. राहुल गांधी यांच्या वक्तव्यामुळे काँग्रेसचा आरक्षणविरोधी चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे, असं ते म्हणाले.  देशाचं विभाजन करण्याचं षडयंत्र रचणाऱ्यांसोबत उभं राहणं आणि

देशविरोधी वक्तव्यं करणं ही राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाची सवय झाली आहे, असंही ते म्हणाले.

राहुल गांधी परदेशात जाऊन नेहमी भारताची, आणि इथल्या नागरिकांची बदनामी करतात, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. तर, लोकसभेला संविधानाबाबत खोटा प्रचार करणाऱ्या राहुल गांधी यांचा खरा चेहरा समोर आला असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

सोयाबीन आणि कापसाचा हमीभाव वाढवण्यासाठी, तसेच निर्यातीला परवानगी देण्यासाठी केंद्र सरकारनं अनुकूलता दर्शवली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित शेतकरी प्रतिनिधींच्या बैठकीत ही माहिती दिली.

विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी कठोर भूमिका घेतली असून त्याचे सकारात्मक परिणाम लवकरच दिसतील, असं त्यांनी सांगितलं. राज्यात ११ हजार ५०० मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीचं उद्दीष्ट असल्यानं कृषीपंपांना दिवसा वीज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. महात्मा जोतीराव फुले शेतकरी सन्मान योजनेंतर्गत, कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यातले अडथळे या महिनाअखेरपर्यंत दूर केले

जातील, असं ते म्हणाले. ऊसाचा एमएसपी वाढवून देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचं अजीत पवार यांनी सांगितलं.

केंद्रीय पणन, सहकार, कृषीमंत्र्यांची भेट घेऊन राज्यातल्या शेतकऱ्यांच्या मागण्या आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, बेल्जियममधल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्याच्या ब्रम्हपुरी तालुक्यातल्या गणेशपुर इथं विजेचा धक्का बसून चार जण ठार तर एक शेतकरी युवक जखमी झाल्याची घटना घडली आहे. जखमी युवकावर स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. ही घटना वन्य प्राण्यांपासून शेत-पिकाचं रक्षण करण्यासाठी लावलेल्या तारांच्या कुंपणामुळं घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

पावसामुळे उद्भवणाऱ्या संकटातही धीर धरुन, प्रयत्नांची पराकाष्ठा करुन जीव वाचवण्याच्या घटना आमच्या वार्ताहरांनी कळवल्या आहेत. त्याबाबत ऐकूया एक वृत्तांत..

**होल्ड- वृत्तांत**

*किर्र जंगल, धो-धो बरसणारा पाऊस, खाली उडी मारावी तर समोर साक्षात मृत्यू, अशा विचित्र परिस्थितीत गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यात गुंडेनूर इथल्या दलसू पोदाडी या आदिवासी नागरिकानं पूर आलेल्या नाल्याच्या मध्यभागी असलेल्या एका झाडावर दोन रात्री आणि एक दिवस असे ३६ तास काढले. पोटात पाणी आणि अन्नाचा एक दाणाही नसताना नैसर्गिक आपत्तीला परतावून लावणारा दलसू आणि जिवाची बाजी लावून त्याला वाचवणाऱ्या जिगरबाज गावकऱ्यांच्या हिंमतीला दाद द्यावीच लागेल.*

*दुसरी घटना आहे भंडारा जिल्ह्यातली. लाखांदूर तालुक्यात चूलबंद नदीच्या तीरावर वसलेल्या जुनी बोथली या गावाला पुरानं वेढा घातल्यानं चारही बाजूंचे रस्ते बंद झाले. नदीवरचा पूलही पाण्याखाली गेला. अशातच या गावातल्या एका महिलेला प्रसववेदना सुरू झाल्या. तदिला रुग्णालयात पोचवण्यासाठी काही नागरिकांच्या विनंतीनुसार तहसीलदारांनी बोटीची व्यवस्था केली, पण ती बोटही खराब झाली. मग जिल्हा प्रशासनाकडून बोट मागवली. आणि या महिलेला बोटीत बसवून बारवा इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आलं. सात तासांच्या या कालावधीत अनेकांनी केलेल्या प्रयत्नांना अखेर यश आलं.*

**<><><><><>**

**भंडारा** जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरु असून  नदी, नाले ओसंडून वाहत आहेत. जिल्हा प्रशासनानं  शाळा-महाविद्यालयाला सुट्टी दिली आहे. वैनगंगा नदीला पूर आला असून तिने धोक्याची पातळी ओलांडली आहे. या नदीवर सुरु असलेल्या पुलाच्या बांधकामासाठी वापरली जाणारी क्रेन आठ किलोमिटर पर्यंत पुराच्या पाण्यात वाहून गेली आहेत. नदी नाल्यांना  पूर आल्यामुळं अनेक गावांचा संपर्क  तुटला आहे. गोसीखुर्द धरणाचे २७ गेट दीड मीटर तर ६ गेट एक मीटर उघडण्यात आले आहेत. त्यामुळं नदीकाठावर असलेल्या भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यातल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जायकवाडी प्रकल्प तसंच नाथसागर जलाशयातून

विसर्ग सुरू करण्यात आल्यानं गोदावरीकाठच्या गावांमध्ये आवश्यक उपाययोजना करण्याच्या  सूचना बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. त्या व्यतिरिक्त गेवराई आणि  माजलगांव  तालुक्यासाठी दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून  पुरामुळं बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना त्वरीत मदत पोचवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

<><><><><>

भारतीय संघ आशियाई अजिंक्यपद हॉकी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दाखल झाला आहे. चीनमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत आज उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत भारताने गतविजेत्या मलेशियावर आठ विरूद्ध एक असा दणदणीत विजय मिळवला. राजकुमार पालने तीन, अराईजीतसिंह हुंडल ने दोन, तर जुगराजसिंह, हरमनप्रीत सिंह आणि उत्तमसिंह यांनी प्रत्येकी एक गोल केला. भारताचा पुढचा सामना येत्या शनिवारी पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानसोबत होणार आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ३९८ अंकांची घसरण झाली आणि तो ८१ हजार  ५२३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १२३ अंकाची घसरण नोंदवत २४ हजार ९१८ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

विदर्भातल्या काही जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचे वारे वाहतील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**